एकेश्वरत्व व प्रेषित्वाचा तर्कशुद्ध पुरावा

लेखक

सय्यद अबुल आला मौदूदी

भाषांतर

मुबारक हुसैन मनियार

"अल्लाहच्या नावाने जो असीम दयावंत व परम कृपावंत आहे"

मोठमोठ्या शहरांत आम्ही पाहतो की शेकडो कारखाने विजेच्या शक्तीवर चालत आहेत. आगगाड्या धावपळ करीत आहेत. संध्याकाळी अकस्मात सहस्रावधी बल्ब प्रकाशमान होतात. उन्हाळ्यात पंखे चालतात. पण या घटनांमुळे आमच्यात चमत्कार व आश्चर्याची कोणतीही स्थिती उत्पन्न होत नाही आणि त्या वस्तूंच्या प्रकाशमान अथवा गतिमान होण्याच्या सवयीमध्ये कोणत्याही प्रकारचे मतभेद निर्माण होत नाहीत. असे का? ते अशासाठी की या बल्बचा संबंध ज्या तारांशी आहे त्यांना आम्ही आपल्या डोळ्यांनी पाहतो. या तारांचा संबंध ज्या विद्युतगृहांशी आहे त्याबद्दलसुद्धा आम्हाला ज्ञान आहे. त्या विद्युतगृहात जे लोक काम करतात त्यांच्या अस्तित्वाची जाणीवदेखील आम्हाला आहे. त्या कामगारावर जो इंजिनीयर लक्ष ठेवीत आहे त्यालासुद्धा आम्ही जाणतो. आम्हाला हेदेखील माहीत आहे की तो इंजिनीयर विद्युतनिर्मितीचे काम जाणतो. त्याच्यापाशी अनेक यंत्रे आहेत आणि त्या यंत्रांना गती देऊन तो ही शक्ती निर्माण करीत आहे. ज्याचे रूप आम्हाला बल्बच्या प्रकाशात पंख्यांच्या फेऱ्यांत, आगगाडीच्या भ्रमणांत, पिठाची चक्की आणि कारखान्यांच्या गतीत दिसून येतात. मग विजेच्या परिणामांना पाहून त्याच्या कारणासंबंधी आमच्यात मतभेद निर्माण न होण्याचे कारण केवळ असे आहे की त्या कारणांचा पूर्ण क्रम आमच्या अनुभूतीत सामील आहे आणि आम्ही त्याचे निरीक्षण केले आहे.

समजा, हेच बल्ब प्रकाशित झाले असते, अशाच प्रकारे फेरे घालत असते, अशाच प्रकारे आगगाड्या व ट्रामगाड्या चालल्या असत्या, चक्क्या व मशिनी अशाच गतिमान असत्या; परंतु त्या तारा ज्यांच्याद्वारे वीज त्याच्यात पोचते, आमच्या दृष्टीला पडल्या नसत्या. विद्युतगृहसुद्धा आमच्या अनुभूतीच्या वर्तुळाबाहेर असते. विद्युतगृहात काम करणाऱ्या कर्मचाऱ्याविषयीसुद्धा आम्हाला काही ज्ञान नसते आणि असेही नसते की या कारखान्याचा एखादा इंजिनीयर आहे, जो आपल्या ज्ञान व सामर्थ्याने कारखाना चालवीत आहे. अशा स्थितीतसुद्धा विद्युताच्या या परिणामांना पाहून आमची हृदये समाधानी झाली असती काय? तेव्हासुद्धा आम्ही अशाच प्रकारे या प्रतिकाच्या सवयीसंबंधी मतभेद दर्शविले असते काय? हे स्पष्ट आहे की आपण याचे उत्तर नकारार्थी द्याल. असे का बरे? अशासाठी की जेव्हा परिणामांची कारणे दडलेली असतील आणि प्रतीकांच्या सवयी अपरिचित असतील तर मनात आश्चर्यासमवेत असमाधान उत्पन्न होणे, डोक्याचे या मोहरबंद रहस्याच्या शोधात लागणे आणि या रहस्यासंबंधी अनुमान व मतांची भिन्नता असणे, एक स्वाभाविक गोष्ट होय.

वादी पक्ष - अनुमान करणारे व शंका घेणारे

आता जरा या कल्पनेवरील चर्चाक्रम पुढे नेऊ या. समजा, हे जे काही गृहीत धरले गेले आहे, वस्तुत: ते जगात प्रत्यक्षात आहे. हजारो व लक्षावधी बल्बज् प्रकाशमान आहेत, लक्षावधी पंखे सुरू आहेत, गाड्या धावत आहेत, कारखाने गतिमान आहेत आणि आमच्यापाशी हे जाणून घेण्याचे कोणतेही साधन नाही की यात कोणती शक्ती कार्यरत आहे? आणि ती कोठून येते? लोक या प्रतीकांना व परिणामांना पाहून चमत्कृत व आश्चर्यचकित होतात. प्रत्येक जण त्यांच्या कारणांच्या शोधात अकलेचे घोडे पळवीत आहेत. कोणी म्हणतो की या सर्व वस्तू आपोआप प्रकाशमान व गतिमान आहेत. त्यांच्या आपल्या अस्तित्वाला सोडून कोणती अशी वस्तू नाही जी त्यांना प्रकाश अथवा गती प्रदान करणारी असावी. कोणी म्हणतो की या वस्तू ज्या मूलतत्त्वापासून बनलेल्या आहेत, त्यांच्याच मिश्रणाने त्यांच्यात प्रकाश व गतीची स्थिती निर्माण केली आहे. कोणी असे म्हणतो की या मूलतत्त्वांच्या जगाव्यतिरिक्त काही दैवते अशी आहेत ज्यांच्यापैकी कोणी बल्ब प्रकाशमान करतो, कोणी ट्राम व आगगाड्या चालवितो, कोणी पंखे फिरवितो आणि कोणी कारखाने व चक्क्या चालविणारा आहे. काही लोक असे आहेत जे विचार करता करता थकून गेले आहेत आणि अखेरीस विवश होऊन म्हणून लागले आहेत की आमची बुद्धी या जादूच्या तथ्यापर्यंत पोचू शकत नाही. आम्ही केवळ इतकेच जाणतो, जितके आम्ही डोळ्यांनी पाहतो व ज्याची आम्हाला अनुभूती होते. यापेक्षा अधिक काही आमच्या लक्षात येत नाही आणि जे काही आमच्या लक्षात येत नाही त्याचे आम्ही समर्थनही करीत नाही की खंडनही करीत नाही.

हे सर्व समूह एकमेकांशी भांडत आहेत. पण आपल्या विचारांचे अनुमोदन आणि दुसऱ्या विचारांच्या खंडनासाठी त्यांच्यापैकी कोणाजवळसुद्धा अनुमान, ग्रह व अंदाजाशिवाय जाणण्याचे अन्य कोणतेही साधन नाही.

प्रतिवादी पक्ष - ज्ञानी

जेव्हा हे मतभेद चालले आहेत, त्यादरम्यान एक व्यक्ती येते आणि म्हणते, "बंधुनो! माझ्यापाशी ज्ञानाचे एक असे साधन आहे जे तुमच्याजवळ नाही. या साधनाद्वारे मला कळले आहे की या सर्व बल्बज्, पंखे, गाड्या कारखाने आणि चक्क्यांचा संबंध काही गुप्त तारांशी आहे, ज्यांची तुम्हाला अनुभूती होत नाही. या तारांमध्ये एक फार मोठ्या विद्युतगृहात ती शक्ती येते जी प्रकाश व गतीच्या रूपाने प्रकट होते. या विद्युतगृहात मोठमोठाली भव्य यंत्रे आहेत, ज्यांना असंख्य लोक चालवीत आहेत. हे सर्व लोक एका मोठ्या इंजिनीयराच्या अधीन आहेत आणि तोच इंजिनीयर आहे, ज्याच्या ज्ञानाने व शक्तीने या संपूर्ण व्यवस्थेला मूर्तस्वरूप दिले आहे. त्याच्याच आदेशाने व देखरेखीत

सर्व कार्ये होत आहेत.''

ही व्यक्ती संपूर्ण शक्तीने आपल्या या दाव्यावर अटळ आहे, लोक तिला खोटे ठरवितात. संपूर्ण लोकसमूह मिळून तिचा विरोध करतात. तिला वेडी ठरवितात. तिला मारतात, त्रास देतात, घरातून हाकलून देतात. परंतु ती या सर्व आत्मिक व शारीरिक संकटे असूनदेखील आपल्या दाव्यावर अटळ राहते. कोणत्याही भय अथवा लालसेने आपल्या निवेदनांत कणभरसुद्धा फरक करीत नाही. कोणत्याही संकटाने तिच्या दाव्यांत निर्बलता येत नाही. तिच्या प्रत्येक गोष्टीने प्रकट होते की तिला आपल्या निवेदानाच्या सत्यतेवर पूर्ण विश्वास आहे.

त्यानंतर एक दुसरी व्यक्ती येते आणि तीसुद्धा जसेच्या तसे निवेदन त्याच दाव्यासह करते. मग तिसरी, चौथी, पाचवी व्यक्ती येते आणि तीच गोष्ट सांगते जी तिच्या पूर्वजांनी सांगितली होती. त्यानंतर येणाऱ्यांची एक रीघ लागली, येथपावेतो की त्यांची संख्या शेकडो आणि हजारोंपेक्षा अधिक वाढते आणि हे सर्वजण त्याच एका निवदनाला, त्याच एका दाव्यासह प्रस्तुत करतात. काळ व निवास आणि स्थितीत फरक असूनदेखील त्यांच्या निवेदनात काहीही फरक होत नाही. सर्वजण म्हणतात की आमच्याजवळ ज्ञानाचे एक असे साधन आहे जे सर्वसामान्य लोकांजवळ नाही. सर्वांना वेडे ठरविले जाते. प्रत्येक प्रकारच्या जुलूम व अत्याचाराचे लक्ष्य बनविले जाते. सर्व प्रकारे त्यांना विवश केले जाते, की आपल्या निवेदनापासून त्यांनी परावृत्त व्हावे. पण सर्वजण आपल्या कथनावर टिकून राहतात आणि जगातील कोणतीही शक्ती त्यांना त्याच्या स्थानापासून एक इंचसुद्धा हटवू शकत नाही. या निश्चय व दृढतेसह त्या लोकांची उल्लेखनीय वैशिष्ट्ये अशी आहेत की त्यांच्यापैकी कोणीही असत्यवचनी, चोर, ठेवी हडप करणारा, व्यभिचारी, अत्याचारी व फुकट्या नाही. त्यांच्या शत्रू व विरोधकांनासुद्धा ही गोष्ट मान्य आहे. त्या सर्वांचे चारित्र्य पवित्र आहे. जीवनचरित्र अत्यंत सदाचारी आहे आणि सदाचारात हे आपल्या अन्य मानवप्राण्यांत श्रेष्ठतर आहेत. याशिवाय त्यांच्या वेडेपणाची चिन्हेही दिसत नाहीत. तर त्याउलट ते शिष्टाचार आत्मशुद्धी आणि जागतिक बाबींच्या सुधारणेसाठी अशा शिकवणी प्रस्तुत करतात व असे कायदेकानून बनवितात ज्यांच्यासमान बनविणे तर सोडूनच द्या, मोठमोठाले पंडित व बुद्धिमान लोकांना त्यातील बारकावे समजण्यात उभे आयुष्य खर्ची घालावे लागते.

बुद्धीच्या न्यायालयात

एकीकडे ते विविध विचारधारी खोटे ठरविणारे आहेत आणि दुसरीकडे समविचारी. दोघांचा वाद परिपूर्ण बुद्धीच्या न्यायालयात प्रस्तुत केला जातो. न्यायाधीश म्हणून बुद्धीचे कर्तव्य आहे की प्रथम स्वत:च्या स्थितीबद्दल चांगल्या प्रकारे जाणून घ्यावे. मग पक्षकारांची स्थिती समजून घ्यावी आणि दोघांची तुलना केल्यानंतर निकाल द्यावा की कोणाचे म्हणणे प्राधान्य देण्यास योग्य आहे.

न्यायाधीशांची आपली स्थिती अशी आहे की खुद्द त्यांच्यापाशी सत्य गोष्ट जाणून घेण्याचे कोणतेही साधन नाही. त्यांना वस्तुस्थितीचे ज्ञान नाही. त्यांच्यासमोर केवळ पक्षकारांचे कथन, त्यांचे पुरावे, त्यांची वैयक्तिक स्थिती, बाह्य लक्षणे व अनुमाने आहेत. त्यांच्यावर चौकस दृष्टी टाकून त्यांना निकाल द्यावयाचा आहे की कोणाचे कथन शक्यतो सत्याधिष्ठित आहे. परंतु शक्यतेपेक्षाही पुढे जाऊन ते आज्ञा लागू करू शकत नाहीत, कारण खटल्याच्या कागदपत्रांवर जो काही पुरावा आहे त्याच्या आधारे असे सांगणे त्यांच्यासाठी कठीण आहे की सत्य गोष्ट काय आहे. ते पक्षकारांपैकी एकास विशेष पसंती देऊ शकतात. परंतु अटळपणे व विश्वासाने कोणाचे समर्थन अथवा खोटे ठरवू शकत नाहीत.

खोटे ठरविणाऱ्यांची स्थिती

१. सत्यासंबंधी त्यांचे दृष्टिकोन विभिन्न आहेत आणि कोणत्याही एका मुद्द्यावर त्यांचे एकमत नाही. येथपावेतो की एकाच समूहाच्या लोकांत कधी कधी मतभेद आढळले आहेत.

२. ते स्वत: मान्य करतात की त्यांच्याजवळ ज्ञानाचे कोणतेही असे साधन नाही, जे दुसऱ्याजवळ नसेल. त्यांच्यापैकी कोणताही समूह याशिवाय कोणत्याही गोष्टीचा दावेदार नाही की आमचे अंदाज दुसऱ्यांच्या तुलनेत जादा विश्वसनीय आहेत. परंतु आपले अंदाज केवळ अंदाजच आहेत हे सर्वांना मान्य आहे.

३. आपल्या अंदाजावर त्यांची श्रद्धा, प्रामाणिकता, विश्वास अढळ दृढतेच्या सीमेपर्यंत पोचलेले आहेत. त्यांच्यात मतपरिवर्तनाची उदाहरणे विपुल प्रमाणात आढळतात. अनेक वेळा असे दृष्टीस आले आहे की त्यांच्यापैकी एखादी व्यक्ती कालपर्यंत जो दृष्टिकोन जोरदारपणे मांडत होती, आज स्वत: तिनेच आपल्या पूर्वीच्या दृष्टिकोनाला रद्द केले आणि एक अन्य दृष्टिकोन प्रस्तुत केला. वय, बुद्धी, ज्ञान व अनुभवाच्या प्रगतीबरोबरच बहुतेक त्यांचे दृष्टिकोन बदलत असतात.

४. वादीच्या म्हणण्याच्या खंडनासाठी त्यांच्याजवळ याशिवाय कोणताही अन्य पुरावा नाही की त्यांनी आपल्या सत्यतेबद्दल कोणताही विश्वसनीय पुरावा प्रस्तुत केला नाही.

त्यांनी त्या गुप्त तारा आम्हाला दाखविल्या नाहीत, ज्यांच्यासंबंधी ते म्हणतात की बल्बज् व पंखे इत्यादींचा संबंध त्यांच्याशीच आहे. त्यांनी विजेचे अस्तित्व अनुभव आणि निरीक्षणाने सिद्ध केले नाही. विद्युतगृह आम्हाला फिरवून दाखविले नाही. त्यातील यंत्र व मशिनींचे निरीक्षण करविले नाही. त्यातील कामगारांपैकी कोणाशी आमची भेट करविली नाही आणि कधी इंजिनीयरांचीसुद्धा भेट करवून दिली नाही. मग आम्ही हे कसे मान्य करावे की हे सर्वकाही सत्य आहेत?

दावेदारांची स्थिती

१) ते सर्वजण समान कथन करणारे आहेत. आवाहनाचे जितके मौलिक मुद्दे आहेत त्या सर्वांसंबंधी त्यांच्यात पूर्ण एकमत आहे.

२) त्या सर्वांचा एकमताने असा दावा आहे की आमच्यापाशी ज्ञानाचे एक असे साधन आहे जे सामान्य लोकांपाशी नाही.

३) त्यांच्यापैकी कुणीही असे सांगितले नाही की आम्ही आमच्या अंदाज अथवा भ्रमापायी असे प्रतिपादन करतो, तर सर्वांनी एकमताने प्रतिपादन केले आहे की इंजिनीयरशी आमचे विशेष संबंध आहेत, त्याचे कामगार आमच्याजवळ येतात. त्याने आम्हाला आपला कारखाना फिरून दाखविला आहे आणि आम्ही जे काही म्हणतो ते ज्ञान व विश्वासाच्या आधारे बोलतो. ग्रह व अंदाजाच्या आधारे बोलत नाही.

४) त्यांच्यात एकसुद्धा उदाहरण असे आढळत नाही की कुणी आपल्या कथनात तिळमात्रसुद्धा परिवर्तन केले असेल. एकच गोष्ट आहे, जी त्यांच्यापैकी प्रत्येक व्यक्ती दाव्याच्या प्रारंभापासून जीवनाच्या अंतिम श्वासापर्यंत सांगत आलेली आहे.

५) त्यांचे जीवनचरित्र परमोच्च कोटीचे पवित्र आहे. असत्य, धोकेबाजी, लबाडी, फसवेगिरीचा लवलेशसुद्धा आढळत नाही आणि कोणतेही कारण दिसत नाही जे लोकजीवनाच्या प्रत्येक बाबीत सत्यवादी आणि खरे नसतील. त्यांनी विशेषकरून याच बाबतीत एकमताने का खोटे बोलावे?

६) या गोष्टीचादेखील काही पुरावा नाही की हा दावा प्रस्तुत करण्यात त्यांच्यासमोर काही वैयक्तिक लाभ आहे. याउलट असे सिद्ध होते की त्यांच्यापैकी बहुतेक सर्वांनी या दाव्यासाठी महान संकटे सहन केली आहेत. शारीरिक त्रास सहन केला, कैदेत ठेवले गेले, मार खावा लागला, देशातून बाहेर काढले गेले, काहींना ठार केले गेले. येथपावेतो की काहींना करवतीने कापले गेले आणि मोजक्या मंडळींशिवाय कुणालाही सुस्थिती व समृद्धीचे जीवन प्राप्त झाले नाही. म्हणून कोणताही वैयक्तिक स्वार्थाचा आरोप त्यांच्यावर लावता येणार नाही, तर त्यांचे अशा स्थितीत आपल्या दाव्यावर अथवा कथनावर टिकून राहणे असे जाहीर करते की त्यांना आपल्या सत्यतेवर परमोच्च दर्जाचा विश्वास होता. इतका प्रचंड विश्वास की आपले प्राण वाचविण्यासाठीसुद्धा त्यांच्यापैकी कोणीही

आपल्या दाव्यापासून परावृत्त झाला नाही.

७) त्यांच्यासंबंधी वेडे अथवा बुद्धीभ्रष्ट असल्याचासुद्धा कोणताही पुरावा नाही. जीवनाच्या सर्व बाबींत ते सर्वच्या सर्व उच्च कोटीचे बुद्धिमान व समंजस असल्याचे आढळले आहे. त्यांच्या विरोधकांनीसुद्धा बहुतेक त्यांच्या बुद्धिमत्तेची श्रेष्ठता मान्य केली आहे. त्याशिवाय हे कसे मान्य करता येईल की त्या सर्वांना याच विशेष बाबतीत वेड लागले आहे आणि ती बाबसुद्धा कशी, जी त्यांच्यासाठी जीवन व मृत्यूची समस्या बनलेली असेल? ज्याच्यासाठी त्यांनी जगभराशी सामना दिला असेल? ज्याच्यासाठी ते वर्षानुवर्षे लढत राहिले असतील. जी त्यांच्या संपूर्ण विवेकपूर्ण शिकवणीचे मूळतत्त्व (त्यांच्या बुद्धिसंगत असल्याबद्दल अनेक खंडन करणाऱ्यांचीसुद्धा मान्यता आहे) असेल.

८) त्यांनीसुद्धा असे सांगितले नाही की आम्ही इंजिनीयर किंवा त्याच्या कामगारांशी तुमची भेट घडवून आणू शकतो अथवा त्याचे गुप्त रहस्य तुम्हाला दाखवू शकतील अथवा अनुभव निरीक्षणाने आपले म्हणणे सिद्ध करू शकतील. ते या तमाम बाबींना 'अपरोक्ष' म्हणून संबोधतात आणि म्हणतात की तुम्ही आमच्यावर विश्वास ठेवा व जे काही आम्ही सांगतो ते मान्य करा.

विवेकी न्यायालयाचा निकाल

पक्षकारांची स्थिती व त्यांच्या जबानीवर विचार केल्यानंतर विवेकाचे न्यायालय आपला निकाल सादर करते. ते म्हणते की काही प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष गोष्टींचा विचार करून त्यांच्या आंतरिक कारणांची चौकशी दोन्ही पक्षांनी केली आहे व प्रत्येकाने आपापले दृष्टिकोन सादर केले आहेत. सर्वांचे दृष्टिकोन या दृष्टीने समान आहेत की प्रथमतः त्यांच्यापैकी कोणांतही तर्काच्या स्थितीत परिवर्तन नाही. अर्थात, तर्कशास्त्राच्या नियमानुसार कोणत्याही दृष्टिकोनासंबंधी सांगितले जाऊ शकत नाही की ते खरे असणे शक्य नाही. तसेच त्यांच्यापैकी कोणाचीही निर्दोषता अनुभव किंवा निरीक्षणाने सिद्ध केली जाऊ शकत नाही. वादी पक्षांपैकी कोणताही समूह आपल्या दृष्टिकोनाचा असा शास्त्रीय पुरावा देऊ शकत नाही, ज्याने प्रत्येक व्यक्तीला विश्वास करण्यास भाग पाडावे आणि प्रतिवादी पक्ष याला समर्थ अथवा त्याचा दावेदारही नाही. परंतु अधिक मनन व चौकशीनंतर काही बाबी अशा दिसतात ज्यांच्यामुळे सर्व दृष्टिकोनांपैकी प्रतिवादी पक्षाचा दृष्टिकोन विशेष पसंतीचा ठरतो.

(१) एखाद्या दुसऱ्या दृष्टिकोनाचे अनुमोदन इतक्या मोठ्या संख्येत बुद्धिमान, पवित्र चरित्र, सत्यवचनी लोकांनी एकत्रित येऊन इतक्या विश्वासाने केलेले नाही.

(२) अशा शुद्ध चारित्र्याच्या व इतक्या मोठ्या संख्येत लोकांचे विविध काळांत व विविध स्थळी या कथनावर एकमत होणे, त्या सर्वांजवळ एक असामान्य ज्ञानाचे साधन आहे आणि त्या सर्वांनी या साधनाने बाह्य कारणांचे आंतरिक कारणे जाणून घेतली

आहेत, आम्हाला या दाव्याचे म्हणजे कथनाचे समर्थन करण्यास भाग पाडीत आहे. विशेषत: या कारणास्तव स्वत:च्या माहितीसंबंधी त्यांच्या कथनात कोणतेही मतभेद नाही. जी माहिती त्यांनी दिली आहे त्यात कोणतेही तर्काच्या स्थितीत परिवर्तनसुद्धा नाही आणि ही बाब बौद्धिक नियमांच्या आधारे कठीण ठरविता येणार नाही की काही लोकांत काही असे असामान्य सामर्थ्य असावेत जे सामान्यत: इतर लोकांत आढळत नसावेत.

(३) बाह्य कारणांच्या स्थितीचा विचार करतासुद्धा अधिक प्रभावी हेच वाटते की प्रतिवादीचा दृष्टिकोन बरोबर असेल. ते अशासाठी की बल्बज्, पंखे, गाड्या, कारखाने वगैरे आपोआप प्रकाशमान व गतिमान होत नाहीत. कारण जर असे असते तर त्यांचे प्रकाशमान आणि गतिमान होणे त्यांच्याच हातात असते. पण वस्तुस्थिती अशी नाही. त्यांचा प्रकाश व गती त्यांच्या शारीरिक मूलतत्त्वांच्या मिश्रणाचा परिणाम नव्हे, कारण जेव्हा ते गतिमान व प्रकाशमान झालेले नसतात, तेव्हासुद्धा असेच मूलतत्त्वांचे मिश्रण असते. त्यांचे वेगवेगळ्या शक्तींद्वारे प्रभावित होणेही खरे वाटत नाही. कारण काही वेळा जेव्हा बल्बज्‌मध्ये प्रकाश असत नाही, तेव्हा पंखेसुद्धा बंद होतात, ट्राम कारही बंद पडते व कारखानेसुद्धा चालत नाहीत. म्हणून बाह्य कारणांच्या कारणमीमांसेत वादी पक्षाकडून जितके दृष्टिकोन प्रस्तुत केले गेले आहेत, ते सर्व बुद्धी व तर्कापलीकडील आहेत. अधिक बरोबर हीच गोष्ट वाटते की त्या सर्व कारणांत एखादी अशी शक्ती कार्यरत असेल व तिचा विशेष संबंध एखाद्या अशा शक्तिमान बुद्धिवंताच्या हाती असावा जो एक ठराविक व्यवस्थेच्या अधीन त्या शक्तीचा विविध कारणास्तव विनियोग करीत असेल.

(४) उरले शंकेखोरांचे हे कथन की ही गोष्ट आमच्या लक्षात येत नाही आणि जी गोष्ट आम्हाला समजत नाही तिचे अनुमोदन अथवा खंडन आम्ही करू शकत नाही. तर बुद्धीचा स्वामी तीदेखील बरोबर असल्याचे मान्य करीत नाही. कारण एखादी गोष्ट घडणे आवश्यक नाही की ती ऐकणाऱ्याच्यासुद्धा लक्षात यावी. ती घडण्याच्या बाबीला मान्य करण्यासाठी विश्वसनीय व निरंतर साक्ष पुरेशी आहे. जर आम्हाला काही विश्वसनीय लोकांनी येऊन सांगितले की आम्ही पाश्चिमात्य देशांत लोकांना लोखंडाच्या गाडीत बसून हवेत उडताना पाहिले आहे आणि स्वत:च्या कानाने लंडनमध्ये बसून अमेरिकेचे गाणे ऐकून आलो आहोत, तर आम्ही केवळ एवढे पाहू की हे लोक खोटे व मस्करी करणारे तर नाहीत ना? त्यांच्या डोक्यात काही दोष तर नाही ना? जर सिद्ध झाले की ते खोटेही नाहीत, मस्करी करणारेही नाहीत, वेडेही नाहीत, त्यांचा कोणताही लाभ या बाबींशी संबंधित नाही आणि जर आम्ही पाहिले की ती गोष्ट मतभेदाविना बरेचसे सत्यवचनी व बुद्धिमान लोक पूर्णपणे गांभीर्याने कथन करती आहेत, तर आम्ही निश्चितपणे ती मान्य करू. मग भले लोखंडाच्या गाड्या हवेत उडणे व एखाद्या संवेदनशील

साधनाशिवाय एका जागेचे गाणे कित्येक हजार मैलाच्या अंतरावर ऐकू जाणे कोणत्याही प्रकारे आमच्या लक्षात येत नसेल.

धर्मावरील श्रद्धा कशी प्राप्त होते?

या बाबतीत विवेकाचा निकाल असा आहे. परंतु सत्य निर्णय व विश्वासाची स्थिती जिचे नाव 'धर्मावरील श्रद्धा' आहे, यातून उत्पन्न होत नाही. त्याच्यासाठी तल्लीनतेची आवश्यकता आहे. त्याच्यासाठी हृदयाची घडण झाली पाहिजे. त्याच्यासाठी आवश्यक आहे की आतून एक आवाज यावा ज्याने खंडन व शंकेच्या सर्व स्थितींना संपुष्टात आणावे व स्पष्ट सांगावे की लोकांचे तर्क खोटे आहेत, खरे तर ते आहे जे खऱ्या लोकांनी तर्काने नव्हे तर ज्ञान व अंतर्दृष्टीनुसार कथन केले आहे.

आदरणीय मुहम्मद (स.) यांच्या पैगंबरत्वाचा तर्कसिद्ध पुरावा

थोडा वेळ डोळे बंद करून कल्पनेचे नेत्र उघडा आणि एक हजार चारशे वर्षे पाठीमागे वळून जगाच्या स्थितीवर दृष्टी टाका. हे कसले जग होते? माणसांमाणसाच्या दरम्यान विचारांच्या देवाणघेवाणीची साधने किती कमी होती. राष्ट्रे व देशांच्या दरम्यान परस्पर संबंधांची साधने किती सीमित होती? मानवाचे ज्ञान किती तोकडे होते? त्याचे विचार किती संकुचित होते? त्यांच्यावर भ्रम व रानटीपणाचा किती मोठा पगडा होता? अज्ञानाच्या अंधकारात ज्ञानाचा प्रकाश किती अंधुक होता? आणि त्या अंधकाराला ढकलून किती मुश्किलीने तो पसरत होता? जगात न तार होती, न टेलिफोन, न रेडिओ व न विमान होते. छापखानेही नव्हते व प्रकाशगृहेसुद्धा नव्हती. शाळादेखील जास्त प्रमाणात नव्हत्या. वर्तमानपत्रे व मासिके प्रकाशित होत नव्हती. पुस्तकेही मोठ्या प्रमाणात लिहिली जात नसत व त्यांचे प्रकाशनदेखील जास्त प्रमाणात होत नसे. त्या काळातील एखाद्या पंडिताचे ज्ञानसुद्धा काही बाबतीत वर्तमान काळातील एखाद्या सामान्य तज्ज्ञापेक्षा कमी होते. त्या काळातील उच्च वर्गाचा मनुष्यदेखील वर्तमान युगातील एखाद्या मजुरापेक्षा कमी सभ्य होता. त्या काळातील एक अत्यंत प्रतिभासंपन्न व्यक्तीसुद्धा आजकालच्या दुर्विचारी व्यक्तीपेक्षा अधिक दुर्विचारी होती. ज्या गोष्टी हल्ली प्रत्येकाला माहीत आहेत त्या गोष्टी त्या काळात वर्षानुवर्षांच्या परिश्रम, शोध व संशोधनानंतरसुद्धा मोठ्या मुष्किलीने माहीत होऊ शकत होती. जी माहिती आज प्रकाशाप्रमाणे वातावरणात पसरलेली आहे आणि प्रत्येक मुलास वयात येताच प्राप्त होते, त्यासाठी त्या काळात शेकडो मैलांचा प्रवास करावा लागे आणि संपूर्ण आयुष्य त्याच्या शोधात व्यतीत होत असे. ज्या गोष्टींना हल्ली भ्रम समजले जाते, त्या गोष्टी त्या काळात 'सत्य' समजल्या जात असत. ज्या कार्यांना हल्ली असंस्कृत व रानटीपणाचे मानले जाते ते त्या काळाचे सर्वसामान्य कार्य

मानले जात असे. ज्या पद्धतीने हल्ली माणसाची सद्सद्विवेकबुद्धी ज्या गोष्टींचा तिरस्कार करते, त्या गोष्टी त्या काळात चारित्र्याच्या दृष्टीने न केवळ धर्मसंमत होत्या, तर कोणतीही व्यक्ती असा विचारदेखील करू शकत नव्हती की त्यांच्या उलटसुद्धा एखादी पद्धत असू शकते. माणसांची चमत्कारपूजा इतकी वाढलेली होती की तो कोणत्याही गोष्टीत तोपर्यंत कोणतेही सत्य, कोणतेही श्रेष्ठत्व, कोणतेही पावित्र्य मान्यच करू शकत नव्हता जोपर्यंत ती निसर्गाविरूद्ध नसेल, सवयीच्या उलट नसावी, असामान्य नसावी. येथपावेतो की मनुष्य स्वत:ला इतका क्षुद्र समजत असे की एखादा माणूस ईश्वरापर्यंत पोचलेला असणे आणि एखादी ईश्वरापर्यंत पोचलेली व्यक्ती माणूस असणे ही गोष्ट त्यांच्या कल्पनेच्या झेपेबाहेरची होती.

अरबस्तान : एक अत्यंत अंधकारपूर्ण प्रदेश

या अंधकारपूर्ण काळात पृथ्वीचा एक कोपरा असा होता जेथे अंधकाराने थैमान माजविले होते. जे देश या काळाच्या संस्कृतीच्या दर्जाप्रमाणे सुसंस्कृत होते, त्यांच्यापासून अरबस्तान हा देश वेगळा पडलेला होता. त्याच्या सभोवती इराण, रोम व इजिप्तसारख्या देशात ज्ञान, कला, संस्कृती व सभ्यतेचा थोडा प्रकाश आढळत होता. पण वाळूच्या मोठमोठ्या पर्वतांनी अरबस्तानला त्यांच्यापासून वेगळे करून टाकले आहे. अरब व्यापारी उंटावरून अनेक महिन्यांचा मार्ग आक्रमीत त्या देशांत व्यापारासाठी जात असत आणि केवळ मालाची अदलाबदल करून परत येत असत. ज्ञान व संस्कृतीचा कोणताही प्रकाश त्यांच्याबरोबर येत नसे. त्यांच्या देशात कोणतीही शाळा नव्हती की ग्रंथालय नव्हते, न ज्ञान व कलेत त्यांना काही रस होता. संपूर्ण देशात काही मोजके लोक होते ज्यांना थोडे लिहिता वाचता येत असे. तेसुद्धा इतके नव्हे की त्या काळातील ज्ञान व कलेने व्हावेत. त्यांच्यापाशी एक श्रेष्ठ नियमबद्ध भाषा होती, ज्यात उच्च विचारांच्या अभिव्यक्तीची असामान्य क्षमता होती. त्यांच्यात उत्तम साहित्यिक अभिरुची विद्यमान होती. परंतु त्यांच्या वाङ्मयापैकी उरलेले जे काही आमच्यापर्यंत पोचलेले आहे, ते पाहता असे लक्षात येते की त्यांची माहिती किती सीमित होती. संस्कृती व शिष्टाचारात त्यांचा दर्जा किती खालचा होता, त्यांच्यावर भ्रमाचा किती मोठा पगडा होता, त्यांच्या विचारसरणीत व सवयींमध्ये किती अज्ञान व असभ्यता होती, त्यांच्या चारित्र्यासंबंधी कल्पना किती कुरूप होत्या.

तेथे कोणतेही रीतसर शासन नव्हते. कोणतीही व्यवस्था व कायदा नव्हता. प्रत्येक टोळी आपल्या जागी स्वतंत्र होती आणि केवळ 'जंगलच्या कायद्या'चे अंमल होते. ज्याची ज्याच्यावर दादागिरी चाले त्याला तो ठार करीत असे व त्याची संपत्ती काबीज करीत असे. ही गोष्ट एका अरब बद्दूच्या डोक्यावरून जात असे की जी व्यक्ती त्याच्या टोळीतील नाही तिला का मारले जाऊ नये, त्याची संपत्ती का काबीज करू नये?

चारित्र्य, संस्कृती व सभ्यतेच्या ज्या काही कल्पना त्या लोकांत होत्या त्या अत्यंत कनिष्ठ व फारच ओबडधोबड होत्या. पवित्र व अपवित्र, योग्य व अयोग्य, शिष्ट व अशिष्टमधील फरक जवळजवळ त्यांना अपरिचित होता. त्यांचे जीवन अत्यंत घाणेरडे होते. त्यांच्या पद्धती रानटीपणाच्या होत्या. व्यभिचार, जुगार, दारू, चोरी, वाटमारी, हत्या आणि रक्तपात त्यांच्या जीवनातील सामान्य गोष्ट होती. ते एकमेकांसमोर नि:संकोचपणे विवस्त्र होत असत. त्यांच्या स्त्रियासुद्धा विवस्त्र होऊन काबागृहाला प्रदक्षिणा घालीत असत. ते आपल्या मुलींना आपल्या हाताने जिवंत पुरत असत, केवळ या मूर्खपणाच्या विचाराने की कोणी त्यांचा जावई बनू नये. ते आपल्या पित्याच्या मृत्यूनंतर आपल्या सावत्र आईशी विवाह करीत असत. त्यांना भोजन करणे, कपडे घालणे व शुचिर्भूततेचे सामान्य शिष्टाचारदेखील माहीत नव्हते.

धर्माच्या बाबतीत ते त्या सर्व प्रकारच्या अज्ञान व मार्गभ्रष्टतेचे भागीदार होते ज्यात त्या काळाचे जग गुरफटलेले होते. मूर्तिपूजा, आत्मापूजा, ग्रह-ताऱ्यांचे पूजन, थोडक्यात असे की एक ईश्वराच्या उपासनेशिवाय तेव्हा जगात जितक्या प्रकारचे 'पूजन' आढळत होते ते सर्व त्यांच्यात प्रचलित होते. पूर्वी होऊन गेलेले पैगंबर व त्यांच्या शिकवणीसंबंधी कोणतेही खरे ज्ञान त्यांच्याजवळ नव्हते. ते इतके नक्कीच जाणत होते की इब्राहीम व इस्माईल त्यांचे पिता होते. पण हे जाणत नव्हते की त्या दोन्ही पितापुत्रांचा धर्म कोणता होता व ते कोणाची उपासना करीत असत. आद व समूदच्या कथासुद्धा त्यांच्यात प्रसिद्ध होत्या. परंतु त्यांच्यासंबंधी ज्या कथा अरबस्तानच्या इतिहासकारांनी लिहिल्या आहेत, त्या वाचा, त्यात तुम्हाला आदरणीय सॉलेह (अ.) व हूद (अ.) याच्या शिकवणीचे कोठेही चिन्ह सापडणार नाही. यहुदी व ख्रिश्चनांच्या माध्यमाने बनीइस्राईलमधील पैगंबरांच्या गोष्टीसुद्धा त्यांच्यापर्यंत पोचल्या होत्या. परंतु त्या जशा काही होत्या त्यांचा अंदाज करविण्यासाठी केवळ एक दृष्टी त्या इस्राईली कथांवर घालणे पुरेसे आहे त्या इस्लामी समीक्षकांनी उद्धृत केल्या आहेत. आपल्याला कळेल की अरबस्तानातील लोक खुद्द बनीइस्राईल ज्या पैगंबरांशी परिचित होते ते कशा प्रकारचे मानव होते आणि पैगंबरत्वासंबंधी त्या लोकांची कल्पना किती खालच्या दर्जाची होती.

मानवतेच्या उपकारकर्त्याचा जन्म होतो

अशा काळात, अशा देशात एक मनुष्य जन्म घेतो. बालपणातच त्याच्या शिरावरील आई-वडिल व आजोबांची छत्रछाया नाहीशी होते. म्हणून अशा दुरावस्थेत एका अरब मुलाला जे थोडेफार शिक्षण मिळू शकले होते तेही त्याला मिळाले नाही. थोडे समज आल्यावर गावंढळ मुलांबरोबर शेळ्या चारू लागतो. तरुण झाल्यावर व्यापाराला लागतो. उठणे-बसणे, भेटी-गाठी सर्वकाही याच अरबांशी असते, ज्यांची स्थिती आपण वर पाहिलीच आहे. शिक्षणाचे नावसुद्धा नाही. एवढेच काय पण लिहिता-वाचतादेखील येत

नाही. एखाद्या ज्ञानी व्यक्तीची संगतसुद्धा लाभली नाही. कारण संपूर्ण अरबस्तानात एकाही ज्ञानी माणसाचे अस्तित्व नव्हते. काही वेळा त्याला अरबस्तानाबाहेर पाऊल टाकण्याची संधी जरूर आली होती, परंतु हा प्रवास केवळ सीरियाच्या प्रदेशापर्यंत सीमित होता. ते तसेच व्यापारी प्रवास जसे त्या काळात अरबस्तानचे व्यापारी काफिले करीत असत. जरी असे गृहीत धरले की या प्रवासात त्याने काही ज्ञान व संस्कृतीच्या अवशेषांचे निरीक्षण केले असेल व काही ज्ञानी मंडळींशी भेटीची संधी त्याला प्राप्त झाली असेल, तरी ही गोष्ट स्पष्ट होते की अशा विखुरलेल्या निरीक्षणाने व अशा अस्थायी भेटी-गाठीने कोणत्याही माणसाची चरित्र-निर्मिती होत नाही. त्यांचा प्रभाव कोणत्याही माणसावर इतका जास्त होऊ शकत नाही की त्याने आपल्या वातावरणातून मुक्त, अगदीच भिन्न, इतकी उच्चता प्राप्त करावी की असले ज्ञान प्राप्त होणे शक्य नाही, जे एक निरक्षर खेडुताला एका देशाचा नव्हे, तर संपूर्ण जगाचा आणि एका विशिष्ट काळासाठी नव्हे तर सार्वकालिक नेता बनवून टाकले. धर्म, नीती, संस्कृती व शिष्टाचाराच्या ज्या कल्पना आणि नियम त्या वेळी जगात कोठेही अस्तित्वात नव्हते, मानवी चरित्राचे जे नमुने त्या वेळी कोठेही आढळतच नव्हते, त्यांच्या प्राप्तीचे कोणतेही साधन होऊ शकत नव्हते.

केवळ अरबस्तानाचेच नव्हे, तर संपूर्ण जगाचे वातावरण नजरेसमोर ठेवा व पाहा. हा माणूस ज्या लोकांत जन्मला, ज्यांच्यात बालपण घालविले, ज्यांच्याबरोबर संगोपन होऊन तरुण झाला. ज्यांच्याशी तो मिळून मिसळून राहिला, ज्यांच्याशी त्याचे व्यवहार राहिले, सुरवातीपासूनच सवयीत, चारित्र्यात तो त्या सर्वांपासून वेगळा दिसत आहे. तो कधी खोटे बोलत नाही. त्याच्या खरेपणाची त्याची संपूर्ण जमात साक्ष देते. त्याच्या एखाद्या सर्वांत वाईट शत्रूनेसुद्धा त्याच्यावर असा आरोप केला नाही की त्याने अमुक प्रसंगी खोटे सांगितले होते. तो कोणाशी अपशब्द बोलत नाही. कुणी त्याच्या तोंडून शिवीगाळ अथवा अश्लील गोष्ट ऐकली नाही. तो लोकांशी सर्व प्रकारचे व्यवहार करतो. परंतु कुणाशी कधीही कटुवचन बोलण्याचा व हमरीतुमरीचा प्रसंगच येत नाही. त्याच्या जिभेत कठोरतेऐवजी गोडवा आहे आणि तोदेखील असा की जो कोणी त्याला भेटतो तो त्याचा प्रशंसक बनतो. तो कोणाशीही दुर्व्यवहार करीत नाही. कोणाचाही हक्क हिरावून घेत नाही. वर्षानुवर्षे व्यापार करूनदेखील कोणाचा एक पैसासुद्धा अयोग्य मार्गाने घेत नाही. ज्या लोकांशी त्याचे व्यवहारसंबंध येतात ते सर्व त्याच्या प्रामाणिकतेवर पूर्ण भरोसा ठेवतात. सर्व लोक त्याला 'अमीन' अर्थात विश्वस्त म्हणतात. शत्रूसुद्धा त्याच्याजवळ आपली संपत्ती ठेवतात आणि तो त्यांचेसुद्धा रक्षण करतो. निर्लज्ज लोकांत तो इतका लज्जाशील की समज आल्यापासून त्याला कुणी विवस्त्र पाहिले नाही. दुश्चरित्र लोकांमध्ये तो असा सत्चरित्र की कधी कोणत्याही दुष्कृत्यात गुरफटून जात नाही. मद्य

व जुगाराला स्पर्शही करीत नाही. अशिष्ट लोकांत तो इतका शिष्ट आहे की प्रत्येक अशिष्टता आणि घाणेरडेपणाचा तिरस्कार करतो आणि त्याच्या प्रत्येक कामात स्वच्छता व शुचिर्भूतता आढळते. पाषाणहृदयींच्या दरम्यान तो असा कोमलहृदयी की प्रत्येकाच्या दु:ख व पीडामध्ये सामील होतो. अनाथ व विधवांना मदत करतो. प्रवाशांचा यजमान बनतो. कोणासही त्याच्याकडून दु:ख पोचत नाही. तो दुसऱ्यासाठी दु:ख सहन करतो. रानटी लोकांत तो असा शांतताप्रिय आहे की आपल्या जमातीत उपद्रव व रक्तपाताचे थैमान पाहून त्याला क्लेश होतो. आपल्या टोळीतील भांडणतंट्यापासून तो अलिप्त राहतो व समझोता करण्याच्या प्रयत्नात पुढे पुढे असतो. मूर्तिपूजकांच्या दरम्यान तो असा सुस्वभावी आणि सद्‌विवेकी आहे की पृथ्वी व आकाशात कोणतीही वस्तू त्याला पूजनीय दिसत नाही, कोणत्याही ईशनिर्मितीच्या समोर नतमस्तक होत नाही, मूर्तींना अर्पण केलेल्या अन्नालासुद्धा तो स्वीकारीत नाही, त्याचे हृदय आपोआप अनेकेश्वरवाद व ईशनिर्मितीच्या उपासनेचा तिरस्कार करते, या वातावरणात हा माणूस असा उठून दिसतो जणू दाट काळोखात एक दिवा प्रकाशमान आहे, अथवा दगडांच्या ढिगांत एक हिरा चमकू लागला आहे.

क्रांती उद्‌भवते

जवळजवळ चाळीस वर्षे असे पवित्र, स्वच्छ व सज्जनतापूर्ण जीवन व्यतीत केल्यानंतर त्याच्या जीवनात क्रांतीचा प्रारंभ होतो. तो या अंधकाराने घाबरून जातो जो त्याच्या सर्व बाजूंनी वेढलेला दिसत आहे. तो अज्ञान, अनीती, दुराचार, अराजकता, अनेकेश्वरवाद व मूर्तिपूजेच्या त्या भयानक समुद्रातून बाहेर पडू इच्छितो, ज्याने त्याला वेढलेले होते. या वातावरणात एखादीसुद्धा गोष्ट त्याला आपल्या स्वभावाला साजेशी दिसत नाही. तो सर्वांपासून दूर जाऊन पर्वतांच्या सान्निध्यात बसू लागतो. एकांत व शांतीच्या जगतात कितीतरी दिवस व्यतीत करतो. उपवास करून आपला आत्मा व आपल्या हृदय व बुद्धीला अधिक जास्त शुद्ध करतो. विचार करतो, चिंतन-मनन करतो, एखादा असला प्रकाश शोधीत असतो ज्यायोगे त्याने या चोहीकडे दाटलेल्या अंधकाराला दूर करावे. अशी शक्ती प्राप्त करू इच्छितो ज्यायोगे या बिघडलेल्या जगाला सावरून पुन्हा सुशोभित करावे.

अकस्मात त्याच्या स्थितीत एक वैभवशाली परिवर्तन दिसून येते. एकदम त्याच्या हृदयात तो प्रकाश येतो जो पूर्वी त्याच्यात नव्हता. अकस्मात त्याच्यात ती शक्ती आली जिचा त्याच्यात अभाव होता. तो गुहेच्या एकांतवासातून निघून येतो. आपल्या जमातीजवळ येतो. तिला तो सांगतो की या मूर्ती ज्यांच्यासमोर तुम्ही नतमस्तक होता, या सर्व असत्य गोष्टी आहेत. त्यांना सोडून द्या. कोणताही मनुष्य, कोणताही वृक्ष, कोणताही दगड, कोणताही आत्मा, कोणताही ग्रह, यास पात्र नाही की तुम्ही त्याच्यासमोर नतमस्तक

व्हावे, त्याची सेवा व उपासना करावी व त्याचे आज्ञापालन करावे. ही पृथ्वी, हा चंद्र, हा सूर्य, हे तारे, ही जमीन व आकाशातील सर्व वस्तू एका ईश्वराची निर्मिती आहेत. तोच तुम्हाला व त्या सर्वांना निर्माण करणारा आहे. त्याचीच सेवा करा, त्याचीच आज्ञा पाळा व त्याच्याचसमोर नतमस्तक व्हा. ही चोरी, ही लूटमार, हा रक्तपात, हा जुलूम व अत्याचार, हा व्यभिचार, जो तुम्ही करता ते सर्व पाप आहेत. त्यांचा त्याग करा. अल्लाहला ते आवडत नाही. खरे बोला, न्याय करा, न कुणाचे प्राण घ्या, न कुणाच्या संपत्तीचे अपहरण करा. जे काही घ्याल ते सत्याने घ्या. जे काही द्याल ते सत्याने द्या. तुम्ही सर्वजण मनुष्य आहात. मनुष्य व अन्य मनुष्य सर्व समान आहेत. न कुणी अपमानाचा डाग घेऊन जन्मला आणि न कुणी सन्मानाचे पदक घेऊन जगात आला. महानता व श्रेष्ठत्व, जात व कुळात नाही, केवळ अल्लाहची भक्ती, सदाचार व पावित्र्यात आहे. जो अल्लाहला भितो व सदाचारी व पवित्र आहे, तोच श्रेष्ठ दर्जाचा मनुष्य होय आणि जो असा नाही तो काहीही नाही. मृत्यूनंतर तुम्हा सर्वांना आपल्या अल्लाहजवळ हजर व्हावयाचे आहे. तुमच्यापैकी प्रत्येक जण आपल्या कृत्यांसाठी अल्लाहसमोर उत्तरदायी आहे. त्या अल्लाहसमोर जो सर्व काही पाहतो व जाणतो. तुम्ही कोणतीही गोष्ट त्याच्यापासून लपवू शकत नाही. तुमच्या जीवनाची कारकीर्द त्याच्यासमोर विना काही कमी-जास्त केल्या प्रस्तुत केली जाईल आणि त्याच कारकीर्दीनुसार तो तुमच्या फळाचा निर्णय देईल. या खऱ्या न्यायाधीशासमोर न कोणती शिफारस चालेल, न लाचलुचपत चालेल, न कुणाचे कूळ विचारले जाईल. तेथे केवळ विश्वास व सत्कृत्यांची विचारणा होईल. ज्याच्यापाशी या गोष्टी असतील तो स्वर्गात जाईल व ज्याच्याजवळ त्यापैकी काहीही नसेल तो विफल होऊन नरकात घातला जाईल.

हा होता तो संदेश जो घेऊन तो गुहेतून बाहेर पडला. अज्ञानी समाज त्याचा शत्रू बनतो. शिव्या दिल्या जातात. दगड मारले जातात. एक दिवस दोन दिवस नव्हे सलग तेरा वर्षे त्याच्यावर कठोरतम् जुलूम केला जातो, येथपावेतो की त्याला त्याच्या जन्मगावातून बाहेर काढले जाते आणि बाहेर काढूनसुद्धा मनाला शांती होत नाही. जेथे जाऊन तो आश्रय घेतो तेथेसुद्धा त्याला हरप्रकारे त्रास दिला जातो. संपूर्ण अरबस्तान त्याच्या विरोधात उभा राहतो व तब्बल आठ वर्षे त्याच्याविरूद्ध युद्ध चालते. ते सर्व कष्ट तो सहन करतो, परंतु आपल्या कथनापासून तिळमात्र बाजूला हटत नाही.

हे शत्रुत्व कशासाठी?

हा समाज त्याचा शत्रू का बनला? संपत्ती व जमिनीचा काही तंटा होता काय? खुनाचा दावा होता काय? तो त्यांच्याकडून जगातील एखादी वस्तू मागत होता काय? नाही. सारे शत्रुत्व केवळ या गोष्टीसाठी होते की तो एक अल्लाहची सेवा, आराधना व सत्कर्म करण्याची शिकवण का देतो? मूर्तिपूजा व अनेकेश्वरत्व आणि दुष्कर्माच्या

विरूद्ध सत्प्रचार का करतो? पुजारी व पुरोहितांच्या नेतृत्वावर का प्रहार करतो? सरदारांच्या सरदारकीचा जादू का फोल ठरवितो? मनुष्य व मनुष्यांच्या दरम्यान असलेला उच्चनीचतेचा फरक का मिटवू इच्छितो? टोळ्यांच्या वांशिक पूर्वग्रहांना अज्ञान का ठरवितो? प्राचीन काळापासून जी सामाजिक व्यवस्था चालत आलेली आहे ती व्यवस्था का भंग करू इच्छितो? समाज म्हणत असे की या गोष्टी ज्या तू सांगत आहेस या सर्व कुळाच्या परंपरा व जातीच्या पद्धतीविरूद्ध आहेत. म्हणून त्या गोष्टी सोडून दे, नाहीतर आम्ही तुझे जीवन दुष्कर करून टाकू.

बरे तर त्या माणसाने हा त्रास का सहन केला? समाज त्याला राजा बनविण्यास तयार होता, धनाचे ढीग त्याच्या पायाशी ओतण्यास तयार होता, या अटीवर की त्याने आपल्या या शिकवणींपासून परावृत्त व्हावे. परंतु त्याने त्या सर्वांना ठोकरले आणि आपल्या शिकवणींकरिता दगडांचा मार खाणे व अत्याचार सहन करणे मान्य केले. अखेर असे का? ते अल्लाहचे उपासक आणि सदाचारी बनण्यात त्याचा काही वैयक्तिक लाभ होता काय? का असा एखादा फायदा होता ज्याच्या तुलनेत राज्य व शासन आणि संपत्ती व ऐश्वर्याच्या सर्व लालसादेखील उपेक्षणीय होत्या? का असा एखादा लाभ होता की ज्याच्यासाठी एका माणसाने कठोरतम शारीरिक व आत्मिक क्लेशात गुरफटून जाणे व पूर्ण तेवीस वर्षे गुरफटून राहणेसुद्धा सहन करावे? विचार करा. काय सत्प्रवृत्ती, त्याग व मानवजातीसाठी सहानुभूतीची यापेक्षा उच्चतर एखादी श्रेणी तुमच्या कल्पनेत येऊ शकते की एखाद्या माणसाने आपल्या एखाद्या लाभासाठी नव्हे तर दुसऱ्यांच्या कल्याणासाठी त्रास सहन केला असेल? ज्यांच्या भल्यासाठी व कल्याणासाठी तो प्रयत्न करतो त्यालाच दगड मारावेत, शिव्या द्याव्यात, घरातून हुसकून देऊन बेघर बनवावे, परमुलुखातसुद्धा त्याचा पाठलाग सोडू नये आणि या सर्व गोष्टी होत असतानादेखील तो त्यांच्या कल्याणाच्या कार्यापासून पराङ्मुख होत नाही.

मग पाहा! एखादा खोटा मनुष्य एखाद्या असत्य बाबीसाठी असली संकटे सहन करू शकतो काय? एखादा क्लृप्त्या लढविणाऱ्या मनुष्याने केवळ कल्पना व अनुमानाने एखादी गोष्ट सांगावी तर हे त्यावर कोसळतात, गावात राहणे कठीण करतात, संपूर्ण देश त्याच्याविरूद्ध सज्ज होतो, प्रचंड सैन्य त्याच्यावर चाल करून येते; पण तो आपल्या तत्त्वापासून लेशमात्र दूर हटण्यास तयार होऊ नये?

ही दृढता, हा निश्चय, ही स्थिरता खुद्द ग्वाही देत आहे की त्याला आपल्या खरेपणावर विश्वास आणि पूर्ण विश्वास होता. जर त्याच्या मनात शंका व संशयाचा लहानसा लवलेशदेखील असता तर तो त्या निरंतर एकवीस वर्षांपर्यंत लागोपाठ येणाऱ्या संकटांच्या वादळासमोर अजिबात टिकला नसता. हा तर त्या व्यक्तीच्या स्थित्यंतराचा एक पैलू होता. दुसरा पैलू तर यापेक्षाही अधिक आश्चर्यकारक आहे.

चाळीस वर्षांच्या वयात बदललेला माणूस

चाळीस वर्षांच्या वयापर्यंत तो एक अरब होता, अगदी सर्वसामान्य अरबाप्रमाणे. या काळात कुणीही या व्यापाऱ्याला एक धर्मोपदेशक, एक मोहिनी घालणारा वक्ता म्हणून ओळखले नव्हते. कुणीही त्याला विवेक व बुद्धिमत्तेच्या गोष्टी करताना ऐकले नव्हते. कुणीही त्याला ईश्वरज्ञान व नीतिमत्तेचे तत्त्वज्ञान व कायदा, राजनीती, अर्थशास्त्र व समाजशास्त्राच्या प्रश्नावर चर्चा करताना पाहिले नव्हते. कुणीही त्याच्याकडून अल्लाह व देवदूत आणि ईशग्रंथ व पूर्वीचे पैगंबर व प्राचीन पैगंबरांचे अनुयायी, अंतिम दिन व मृत्यूनंतरचे जीवन व जन्नत व जहन्नुमसंबंधी एक शब्ददेखील उच्चारताना ऐकले नव्हते. तो शुद्ध चरित्र, शिष्टाचार व उत्तम जीवनाचा तर निश्चितच धनी होता. पण चाळीस वर्षांच्या वयाला पोचेपर्यंत त्याच्यात कोणतीही असामान्य अशी गोष्ट आढळली नाही की ज्यायोगे लोकांनी अशी अपेक्षा करावी की हा मनुष्य असामान्य बनणार आहे. त्या वेळेपर्यंत परिचित मंडळी त्याला केवळ एक अबोल, शांतताप्रिय व अत्यंत सज्जन मनुष्य म्हणूनच ओळखत असत. परंतु चाळीस वर्षांनंतर जेव्हा तो आपल्या गुहेतून एक नवीन संदेश घेऊन निघाला तेव्हा पूर्णतः त्याचा कायापालट झाला होता.

आता तो एक आश्चर्यकारक वाणी ऐकवीत होता. ती ऐकून संपूर्ण अरबस्तान थक्क झाला. या वाणीच्या प्रभावाच्या तीव्रतेची स्थिती अशी होती की त्याचे कट्टर शत्रूसुद्धा ती ऐकताना भीत होते की एखादे वेळी याने आमच्या हृदयात ठिय्या मांडू नये. त्याची प्रासादिक भाषा व अलंकारयुक्त शैली आणि ओघवत्या वर्णनशैलीचा असा प्रभाव होता. संपूर्ण अरबस्तानला ज्यात मोठमोठे कवि, धर्मोपदेशक व भाषातज्ञ होते, त्यांना आव्हान दिले आणि वरचेवर आव्हान दिले की तुम्ही सर्वजण मिळून केवळ एकच सूरह याच्याप्रमाणे बनवून आणा. परंतु कोणीसुद्धा त्याच्याशी सामना करण्यास धजला नाही. अशी अनुपम वाणी अरबांनी कधीही ऐकली नव्हती.

त्याचा वैश्विक संदेश

आता तो अकस्मातपणे एक अनुपम तत्त्वज्ञ, एक एकमेव नीती व संस्कृतचा सुधारक, एक आश्चर्यकारक राजनीतिज्ञ, एक जबरदस्त कायदे करणारा, एक उच्च कोटीचा न्यायाधीश, एक अनुपम सेनापती म्हणून प्रकट झाला. त्या निरक्षर वाळवंटवासीने तत्त्वज्ञान व शहाणपणाच्या त्या गोष्टी सांगण्यास सुरूवात केली ज्या ना त्याच्यापूर्वी कुणी सांगितल्या होत्या ना त्याच्यानंतर कोणी सांगू शकला. तो निरक्षर ईश्वरविषयक ज्ञानाच्या वैभवशाली समस्यांवर निर्णायक भाषण करू लागला. मानवी इतिहासातून पैगंबरांच्या अनुयायींच्या उत्कर्ष व अपकर्षाच्या तत्त्वज्ञानावर भाषणे देऊ लागला. प्राचीन सुधारकांच्या कर्तबगारीवर समीक्षा, जगातील धर्मावर टीका व जगातील मतभेदाचे निर्णय

करू लागला. चारित्र्य, संस्कृती व शिष्टाचाराचे पाठ देऊ लागला.

त्याने समाजशास्त्र, अर्थशास्त्र व सामूहिक बाबी आणि आंतरराष्ट्रीय संबंधाबद्दल कायदे करावयास सुरुवात केली व असले कायदे तयार केले की मोठमोठाले विद्वान व बुद्धिमान मनन व चिंतन आणि आयुष्यभरच्या अनुभवानंतर मोठ्या मुष्किलीने त्यांच्या तत्त्वज्ञानाला समजू शकतात व जगाचे अनुभव जितके वाढत जात आहेत तितके त्यांचे तत्त्वज्ञान अधिक खुलून स्पष्ट होत आहे.

तो शांतताप्रिय व्यापारी ज्याने संपूर्ण आयुष्यात कधी तलवार चालविली नव्हती, कधी कोणतेही सैनिकी प्रशिक्षण घेतले नव्हते. आयुष्यात केवळ एकदा एका युद्धात तो एक निरीक्षक म्हणून सामील झाला होता, तो पाहता पाहता एक असा शूर सैनिक बनला की त्याचे पाऊल तुंबळ युद्धातसुद्धा आपल्या जागेवरून एक इंचभरही हटले नाही. एक असा महान सेनापती बनला की ज्याने नऊ वर्षांत संपूर्ण अरबस्तान जिंकले. असा आश्चर्यकारक सैन्यप्रमुख बनला की त्याने निर्माण केलेली सैनिकव्यवस्था व युद्धनीतीच्या प्रभावाने कोणत्याही युद्धसामग्रीविना अरबांनी काही वर्षांतच जगाच्या दोन वैभवशाली सैनिक शक्तींना धूळ चारली.

तो एकांतवासात राहणारा शांतताप्रिय मनुष्य, ज्याच्यात कुणाला चाळीस वर्षांपर्यंत राजनैतिक आवडीचा गंधदेखील आढळला नव्हता, तो एकाएकी इतका श्रेष्ठ सुधारक व राजनीतिज्ञ बनून जगासमोर आला की, तेवीस वर्षांत त्याने बारा लक्ष चौरस मैलात पसरलेल्या वाळवंटातील फुटीर लोक, योद्धे, अज्ञानी, बंडखोर, असभ्य व नेहमी आपापसांत लढणाऱ्या टोळ्यांना रेल्वे, तार, रेडिओ आणि प्रेसच्या मदतीशिवाय एक धर्म, एक संस्कृती, एक कायदा व एका राज्यव्यवस्थेच्या अधीन बनवून टाकले. त्याने त्यांची विचारधारा बदलून टाकली. त्यांच्या सवयी बदलल्या. त्यांचे चारित्र्य बदलून टाकले. त्यांची अशिष्टता उच्च दर्जाच्या शिष्टतेत, त्यांच्या जंगलीपणाला उत्तम नागरिकत्वात परिवर्तीत केले. त्यांच्या व्यभिचार व असभ्यपणाला सदाचार, ईशभिरुता व उच्च सभ्यपणात, त्यांच्या बंडखोरी व अराजकतेला उत्तम प्रकारचे कायदेपालन व आज्ञापालनात परिवर्तीत केले. त्या वंध्य राष्ट्राच्या मांडीवर शेकडो वर्षांपासून एखादासुद्धा उल्लेखनीय बाळ खेळला नव्हता, त्याने त्या राष्ट्राला मानवतेचे पीक देण्यासारखे इतके सुपीक बनविले की त्यात हजारो महान लोकांनी जन्म घेतला व जगाला धर्म, नीती व सभ्यतेचे पाठ देण्यासाठी जगात चोहीकडे पसरले.

हे कार्य त्याने जुलूम-जबरदस्ती, धोका आणि फसवेगिरीने पार पाडले नाही, तर मन मोहून टाकणाऱ्या स्वभावाने व आत्म्याला जिंकणाऱ्या सज्जनपणा व बुद्धीला वश करणाऱ्या शिकवणीने पार पाडले. त्याने आपल्या सुस्वभावाने शत्रूंना मित्र बनविले. दया व प्रेमभावनेने मने मऊ केली. न्याय व समतेने राज्याची धुरा हाकली. सत्य व

सचोटीपासून कधी केसभरसुद्धा ढळला नाही. युद्धातसुद्धा कोणाशी प्रतिज्ञाभंग व धोकेबाजी केली नाही. आपल्या अत्यंत वाईट शत्रूवरसुद्धा जुलूम केला नाही. ज्यांना त्याच्या रक्ताची तहान होती, ज्यांनी त्याच्यावर दगडांचा वर्षाव केला होता, त्याला जन्मभूमीतून हाकलले होते, त्याच्याविरूद्ध संपूर्ण अरबस्तानाला उभे केले होते, येथपावेतो की ज्यांनी शत्रुत्वाच्या आवेशात त्याच्या चुलत्याचे काळीजदेखील काढून चावले होते; त्यांनासुद्धा त्याने विजय प्राप्त केल्यानंतर क्षमा केली. आपल्या स्वत:साठी त्याने कधीही कोणावर सूड उगवले नाहीत.

या सर्व गोष्टींबरोबरच त्याची निरपेक्षता इतकी होती की जेव्हा तो संपूर्ण देशाचा बादशाह बनला तेव्हा तो तसाच फकीर राहिला जसा पूर्वी होता. गवताच्या झोपडीत राहत असे. पोत्यावर झोपत असे. साधेसुधे वस्त्र परिधान करीत असे. गरीबाप्रमाणे अन्न सेवन करीत असे. उपासमारदेखील होत असे. रात्रभर अल्लाहच्या आराधनेत उभा राहत असे. गरीब व संकटग्रस्तांची सेवा करीत असे. एखाद्या मजुराप्रमाणे काम करण्यातसुद्धा त्याला संकोच नसे. शेवटपर्यंत त्याच्यात राजसी थाटमाट व श्रीमंती अहंकार आणि मोठ्या लोकांप्रमाणे घमेंडीचा थोडादेखील गंध आला नाही. तो एखाद्या साध्या माणसाप्रमाणे लोकांना भेटत असे. त्यांच्या सुखदु:खात सामील होत असे. सामान्य लोकांत तो अशा प्रकारे बसत असे ज्यामुळे नवख्या माणसाला हे कळणे कठीण होत असे की या सभेत बसलेला देशाचा बादशाह कोण आहे. एवढा मोठा माणूस असूनदेखील लहानांत लहान माणसाशीसुद्धा असा वागत असे जणू तो त्याच्यासारखाच एक मनुष्य आहे. संपूर्ण आयुष्यभराच्या संघर्षात त्याने आपल्यासाठी काहीही पाठीमागे बाकी ठेवले नाही. आपल्या पाठीमागे जे काही शिल्लक होते ते त्याने आपल्या समाजाला देऊन टाकले. आपल्या अनुयायांवर त्याने स्वत:चे अथवा आपल्या संततीचे कोणतेही अधिकार लादले नाहीत. इतकेच नव्हे तर आपल्या संततीला जकात (शंभराला अडीच रुपये अनिवार्य धार्मिक कर) घेण्याच्या अधिकारापासून वंचित केले, केवळ या भीतीने की एखादे वेळी भविष्यात त्याच्या अनुयायांनी त्याच्या संततीलाच संपूर्ण जकात देण्यास सुरुवात करू नये.

मानवतेवर त्याचा प्रचंड प्रभाव

अद्याप त्या वैभवशाली माणसाच्या श्रेष्ठत्वाची सूची संपलेली नाही. त्याच्या दर्जाच्या योग्य मूल्यांकनासाठी आपणास मानवी इतिहासावर एकत्रितपणे एक दृष्टी टाकावी लागेल. आपण पाहाल की अरबस्थानाच्या वाळवंटातील हा निरक्षर मनुष्य जो चौदाशे वर्षांपूर्वी त्या अंधकारयुगात जन्मला होता, तो वास्तविकत: आधुनिक युगाचा पायिक व संपूर्ण जगाचा नेता आहे. तो न केवळ त्यांचा नेता आहे जे त्याला नेता मानतात, तर त्यांचाही नेता आहे जे त्याला मानत नाहीत. त्यांना या गोष्टीची जाणीवसुद्धा नाही की ज्याच्या विरोधात ते तोंड उघडतात त्याचे मार्गदर्शन कशा प्रकारे त्यांच्या विचारसरणीत, त्यांच्या

जीवन सिद्धान्तात व व्यवहारविषयक नियमांत आणि त्यांच्या आधुनिक युगाच्या आत्म्यात सामावलेले आहे.

हाच तो गृहस्थ आहे ज्याने जगाच्या विचारसरणीची दिशा लोकभ्रम व चमत्कारभक्ती आणि आजन्म ब्रह्मचर्याचे जीवन जगण्यापासून वळवून तर्क व सत्यप्रियता आणि ईशभीरूतापूर्ण जीवनाकडे आणले. त्यानेच इंद्रियगम्य चमत्कारांची मागणी करणाऱ्या जगात तर्कसिद्ध चमत्कारांना समजणे व त्यांनाच सत्यतेचे प्रमाण मानण्याची अभिरुची उत्पन्न केली. त्यानेच सवयी मोडण्याच्या हेतूने ईश्वराच्या ईशत्वाची लक्षणे शोधणाऱ्यांचे डोळे उघडले व त्यांना नैसर्गिक लक्षणांत अल्लाहची चिन्हे पाहण्याची सवय लावली. त्यानेच काल्पनिक घोडे दामटणाऱ्यांना अंदाज लावण्याच्या सवयीपासून परावृत्त करून बुद्धी व विवेक, निरीक्षण व शोधक वृत्तीच्या मार्गाला लावले. त्यानेच तर्क, अनुभूती व तल्लीनता यामधील वैशिष्ट्यपूर्ण सीमा मनुष्याला दाखविल्या. जडवाद व अध्यात्मात संबंध निर्माण केले. धर्माशी ज्ञान व आचरणाची सांगड घातली. धर्माच्या शक्तीपासून जगात शास्त्रीय भावना व शास्त्रीय भावनेतून खरी धार्मिकता निर्माण केली. त्यानेच अनेकेश्वरत्व व निर्मितीपूजनाचा पाया उखडून टाकला आणि ज्ञानाच्या शक्तीशी एकेश्वरत्वाचा दृढ विश्वास इतका मजबुतीने जोडला की अनेकेश्वरवादी व मूर्तीपूजकांचे धर्मसुद्धा एकेश्वरत्वाचा रंग धारण करण्यास बाध्य झाले. त्यानेच नीती व आध्यात्मिकतेच्या मौलिक कल्पना परिवर्तीत केल्या. जे लोक संसाराचा त्याग व कामवासनांचे दमन करण्यास सदाचार समजत असत, ज्यांच्या दृष्टीने कामवासना व शरीराचे हक्क देणे आणि ऐहिक जीवनाच्या व्यवहारात भाग घेतल्यास आध्यात्मिक प्रगती व मुक्ती संभवच नव्हती, त्यांना त्यानेच सभ्यता व समाज आणि जगाच्या कार्यात सदाचाराचे श्रेष्ठत्व आणि आध्यात्मिक उन्नती व मुक्ती प्राप्तीचा मार्ग दाखविला. पुन्हा तोच आहे ज्याने माणसाला त्याचे खरे मूल्य समजावून दिले. जे लोक भगवान व अवतार आणि ईश्वराच्या पुत्राशिवाय कोणालाही आदेश देणारा व मार्गदर्शक म्हणून स्वीकार करण्यास तयार नव्हते, त्यांना त्यानेच समजावून दिले की माणूस तोही तुमच्यासारखाच माणूस आकाशी सत्तेचा प्रतिनिधी व जगदीश्वराचा सरदार बनू शकतो. जे लोक प्रत्येक शक्तिमान माणसाला ईश्वर मानीत होते, त्यांना त्यानेच समजावून दिले की मनुष्य मनुष्याव्यतिरिक्त अन्य काहीही नाही. ना कोणता मनुष्य पावित्र्य, सत्ता व स्वामित्वाचा अधिकार घेऊन आलेला आहे, ना कोणावर अपवित्रता, अधीनता व गुलामीचा जन्मत: डाग लागलेला आहे. याच शिकवणीने जगात मानवी एकत्व व समानता आणि गणतंत्र व स्वातंत्र्याच्या विचारांना जन्म दिला आहे.

कल्पनेच्या जगतातून बाहेर पडा. तुम्हाला त्या निरक्षराच्या नेतृत्वाचे व्यावहारिक परिणाम जगाच्या कायदे व पद्धती आणि व्यवहारात इतक्या विपुल प्रमाणात दिसून

येतील की त्यांची गणना करणे कठीण होईल. नीती व संस्कृती, शिष्टाचार, शुचिर्भूतता व पावित्र्याचे अनेक नियम आहेत, जे त्याच्या शिकवणीतून निघून त्यांचा संपूर्ण जगात प्रसार झाला. सामाजिक संबंधांच्या दृष्टीने जे कायदे त्याने केले होते, जगाने किती मोठ्या प्रमाणात त्याचा लाभ घेतला आहे आणि अद्याप घेत आहे. अर्थशास्त्राचे जे नियम त्याने शिकविले होते, त्यांच्यापासून जगात किती आंदोलने उभी राहिली आणि अद्याप उभी राहत आहेत. राजसत्तेची पद्धती त्याने अवलंबिली होती त्यापासून जगाच्या राजनीतिक दृष्टिकोनात किती क्रांत्या झाल्या व होत आहेत. न्याय व कायद्याशी संबंधित जे नियम त्याने तयार केले होते, त्यांनी जगाच्या न्यायव्यवस्था व कायदेसंबंधी विचारांना किती प्रभावित केले व अद्याप त्यांचा प्रभाव दिसून येत आहे. युद्ध व तह आणि आंतरराष्ट्रीय संबंधांची संस्कृती ज्या माणसाने कृतीने जगात स्थापन केली तो वास्तविकत: हाच अरबस्तानचा निरक्षर होता, नाहीतर पूर्वी जग या गोष्टीने अपरिचित होते की युद्धाचीसुद्धा काही संस्कृती असते आणि वेगवेगळ्या राष्ट्रात संयुक्तपणे मानवतेच्या आधारावरसुद्धा तह होणे शक्य आहे.

मानवी इतिहासात या आश्चर्यजनक माणसाचे अत्युच्च व्यक्तिमत्त्व इतके उठावदार दिसते की प्रारंभापासून आजपर्यंत मोठ्यात मोठ्या ऐतिहासिक व्यक्ती ज्यांची गणना जगश्रेष्ठींत होते, जेव्हा हे सर्व याच्यासमोर आणले जातात तेव्हा ते त्याच्यासमोर ठेंगणे दिसतात. जगातील श्रेष्ठींपैकी कोणीसुद्धा असा नाही ज्याच्या कौशल्याचा तेज मानवी जीवनाच्या एक दोन क्षेत्रापेक्षा पुढे जात नाही. कुणी विचारसरणीचा बादशाह आहे, परंतु त्यात अंमलबजावणीचे सामर्थ्य नाही. कुणी कृतीशील आहे पण वैचारिकतेत निर्बल आहे. कुणाचे कौशल्य राजकीय डावपेचापर्यंत सीमित आहे. कुणी केवळ सैनिकी चातुर्याचा निदर्शक आहे. कोणाची दृष्टी सामूहिक जीवनाच्या एखाद्या पैलूवर इतकी जास्त सखोल खिळून आहे की अन्य पैलू अदृश्य झाले आहेत. कुणी नीती व आध्यात्मिकता उचलली तर अर्थकारण व राजकारणाचा त्याला विसर पडला. एखाद्याने अर्थकारण व राजकारण घेतले तर नीती व आध्यात्मिकतेकडे दुर्लक्ष केले. थोडक्यात असे की इतिहासात सर्वत्र एकक्षेत्रीय नेतेच दृष्टिगोचर होतात. परंतु एकमेव हेच व्यक्तिमत्त्व असे आहे ज्यात सर्व प्रकारची कौशल्ये एकवटलेली आहेत. तो स्वत:च तत्त्वज्ञ व विद्वानसुद्धा आहे आणि स्वत:च आपल्या तत्त्वज्ञानाच्या कार्यवाहीची अंमलबजावणी करणारासुद्धा आहे. तो राजनीतिक मुत्सद्दीसुद्धा आहे. सैनिक नेताही आहे. कायदे करणाराही आहे. नीतीपाठ देणारा शिक्षकदेखील आहे. धार्मिक व आध्यात्मिक पुढारीसुद्धा आहे. त्याची दृष्टी मनुष्याच्या संपूर्ण जीवनावर पसरलेली आहे व अत्यंत बारीक तपशीलात पोचते. भोजन करण्याचे व पाणी पिण्याचे शिष्टाचार आणि शरीराच्या स्वच्छतेच्या पद्धतीपासून आंतरराष्ट्रीय संबंधापर्यंत प्रत्येक गोष्टीसंबंधी तो आज्ञा व आदेश देतो. आपल्या दृष्टिकोनाप्रमाणे एक भविष्यकालीन

संस्कृती प्रत्यक्षात आणून दाखवितो आणि जीवनाच्या सर्व विविध पैलूंत असे योग्य संतुलन प्रस्थापित करतो की न्यूनाधिकतेचे चिन्हसुद्धा कोठे दिसत नाही. एखादा असा सर्वगुणसंपन्न मनुष्य तुमच्या दृष्टीत आहे काय?

महानतम क्रांतिकारी व्यक्तिमत्त्व

मानवी इतिहासातील महान व्यक्तिमत्त्वांपैकी एखादेसुद्धा व्यक्तिमत्त्व असे नाही जे कमी अधिक प्रमाणात आपल्या वातावरणाची निर्मिती नसावी. परंतु या व्यक्तीचे वैभव सर्वांपेक्षा वेगळेच आहे. त्याच्या निर्मितीत त्याच्या वातावरणाचा काहीही वाटा दिसत नाही. कोणत्याही पुराव्याने हे सिद्ध करणे अशक्य की, अरबस्थानच्या वातावरणाला ऐतिहासिकदृष्ट्या अशा एखाद्या माणसाच्या जन्माची आवश्यकता होती. फारच ओढाताण करून जर तुम्ही काही सांगू शकाल तर यापेक्षा अधिक काही सांगू शकणार नाही की ऐतिहासिक कारणे अरबस्थानात एखाद्या अशा नेत्याच्या आगमनाची प्रतीक्षा करीत होती की ज्याने टोळ्यांतील फाटाफूट मिटवून त्यांना एक जमात बनवावे आणि देशांना जिंकून अरबांच्या आर्थिक कल्याण व उन्नतीची व्यवस्था करावी. म्हणजे असा राष्ट्रवादी नेता जो त्या काळातील सर्व अरबी वैशिष्ट्यांचा धारक असेल. त्याने जुलूम, निर्दयता, रक्तपात व फसवेगिरी आणि धोकेबाजीपासून थोडक्यात सर्व शक्य उपायांनी आपल्या जमातीला खुशाल बनवावे आणि एक राज्य निर्माण करून आपल्या उत्तराधिकारीसाठी सोडून जावे. याच्याशिवाय त्या काळाच्या अरबी इतिहासाचा कोणतीही निकड तुम्ही सिद्ध करू शकत नाही. हेगलच्या इतिहासाचे तत्त्वज्ञान अथवा मार्क्सच्या इतिहासाच्या जडवादी स्पष्टीकरणाच्या दृष्टिकोनाने तुम्ही जास्तीतजास्त हाच निर्णय देऊ शकता की त्या काळात अशा वातावरणात एक राष्ट्र व एक राज्य बनविणारा जन्माला येणे आवश्यक होते अथवा उद्‌भवू शकत होता. परंतु हेगल अथवा मार्क्सचे तत्त्वज्ञान या घटनेचे स्पष्टीकरण कसे करील की त्या काळात त्या वातावरणात असा मनुष्य जन्मास आला जो उत्तम नीतीमत्ता शिकविणारा, मानवतेला शोभायमान करणारा व मने शुद्ध करणारा आणि अज्ञान युगाचे भ्रम व दुराभिमानाला नष्ट करणारा होता. ज्याची दृष्टी जात, जमात व वंश आणि देशाच्या हद्दी ओलांडून संपूर्ण मानवतेवर पसरली. ज्याने आपल्या जमातीसाठी नव्हे तर मानवी जगासाठी एक नैतिक व आत्मिक आणि सांस्कृतिक व राजनैतिक व्यवस्थेचा पाया घालून दिला. ज्याने आर्थिक व्यवहारात व देशाचे राजकारण आणि आंतरराष्ट्रीय संबंधांना कल्पनेच्या जगतात नव्हे तर प्रत्यक्ष जगतात नैतिक मूल्यांवर स्थापित करून दाखविले. आध्यात्मिकता व जडत्वाचे असे समतोल व संतुलित मिश्रण केले जे आजसुद्धा विवेक व शहाणपणाची तशीच उत्कृष्ट कृती आहे जशी त्या काळात होती. अशा व्यक्तीला तुम्ही अज्ञानात बुडालेल्या अरबस्तानाच्या वातावरणाची उत्पत्ती सांगू शकाल काय?

इतकेच नव्हे की ती व्यक्ती तात्कालीन परिस्थितीची (वातावण) उत्पत्ती दिसत नाही तर आम्ही जेव्हा त्याच्या महान कार्याचा विचार करतो तेव्हा असे लक्षात येते की तो काळ व देशाच्या बंधनापासून मुक्त आहे. त्याची दृष्टी काळ व स्थितीच्या पाशांना तोडीत शेकडो आणि सहस्राब्द वर्षांच्या पडद्यांना फाडीत पुढे सरसावते. तो मानवाला प्रत्येक काळात व प्रत्येक वातावरणात पाहतो आणि त्याच्या जीवनासाठी असे नीतिपूर्ण व व्यावहारिक आदेश देतो जे प्रत्येक स्थितीत समानतेने व अनुकूलतेसह लागू होतात. तो त्या लोकांपैकी नव्हे ज्यांना इतिहासाने प्राचीन संबोधिले आहे, ज्यांची प्रशंसा आम्ही केवळ यासाठी करू शकतो की ते आपल्या काळातील चांगले मार्गदर्शक होते. सर्वांपेक्षा भिन्न व सर्वश्रेष्ठ, तो मानवजातीचा असा मार्गदर्शक आहे, जो इतिहासाबरोबर मार्गक्रमण करतो आणि प्रत्येक काळात तसाच आधुनिक दिसतो जसा यापूर्वीच्या काळासाठी होता.

तुम्ही ज्या लोकांना उदारपणे 'इतिहास घडविणारे'ची उपाधी देता ते वास्तविकपणे इतिहासाची निर्मिती होत.

खरे पाहता इतिहास निर्माण करणारी संपूर्ण मानवी इतिहासात केवळ हीच एक व्यक्ती होय. जगाच्या जितक्या नेत्यांनी इतिहासात क्रांती घडवून आणल्या आहेत, त्यांच्या जीवनचरित्रावर शोधक दृष्टी टाका. तुम्ही पाहाल की प्रत्येक अशा प्रसंगी अगोदरपासूनच क्रांतीची कारणे निर्माण होत होती आणि ती कारणे स्वत:च त्या क्रांतीची दिशा आणि मार्गही निश्चित करीत होते, ज्याच्या उद्‌भवण्याचे ते इच्छुक होते. क्रांतिकारी नेत्याने केवळ इतके केले की स्थितींच्या आवश्यकतेला शक्तीने कृतीत आणण्यासाठी त्या नटाची भूमिका वठविली ज्याच्यासाठी रंगमच व काम अगोदरच ठरलेले असावे. परंतु इतिहास घडविणारे अथवा क्रांतीची कारणे अस्तित्वात नव्हती, तेथे त्याने स्वत: कारणे निर्माण केली. जेथे क्रांती होण्यासाठी सामग्री नव्हती तेथे त्याने स्वत: सामग्री तयार केली, जेथे त्या क्रांतीची भावना व व्यावहारिक पात्रता लोकांत आढळत नव्हती तेथे त्याने स्वत: आपल्याला उपयुक्त माणसे तयार केली, आपल्या प्रचंड व्यक्तिमत्त्वाला वितळवून हजारो लोकांच्या हृदयात उतरविले आणि त्यांना तसे बनविले जसे तो बनवू इच्छित होता. त्याची शक्ती आणि इच्छाशक्तीने स्वत:च क्रांतीची सामग्री तयार केली, स्वत:च त्याचे स्वरूप व पद्धती ठरविली आणि स्वत:च आपल्या इच्छाशक्तीने स्थितीची गती वळवून त्या मार्गावर चालविली ज्यावर तो तिला चालवू इच्छित होता. असा वैभवशाली इतिहास निर्माण करणारा व या श्रेणीचा क्रांतिकारी मानवी इतिहासात कोठे तुमच्या दृष्टीस पडतो काय?

अंतिम पुरावा

आता या प्रश्नाचा विचार करा की चौदाशे वर्षांपूवीच्या अंधकारमय जगात अरबस्तानसारख्या अत्यंत अंधकारपूर्ण देशाच्या एका कोपऱ्यात एक मेंढपाळ व व्यापार

करणाऱ्या निरक्षर माणसात अकस्मात इतके ज्ञान, इतका प्रकाश, इतकी शक्ती इतके कौशल्य, इतक्या प्रचंड प्रशिक्षित शक्ती निर्माण होण्याचे कोणते साधन होते? आपण म्हणता की ही सर्व त्याच्या मन व बुद्धीची उत्पत्ती होती. मी म्हणतो की जर हे त्याच्याच मन व बुद्धीचे उत्पादन होते तर त्याला ईशत्वाचा दावा करावयास हवा होता. जर त्याने असा दावा केला असता तर ते जग ज्याने रामाला ईश्वर बनवून टाकले, ज्याने कृष्णाला भगवान ठरविण्यात मागेपुढे पाहिले नाही, त्याने बुद्धाला आपोआपच उपास्य बनविले, ज्याने येशू ख्रिस्ताला स्वत: आपल्याच इच्छेने ईश्वरपुत्र मानले, त्याने अग्नी व पाणी आणि हवेचीदेखील पूजा केली; त्या जगाने अशा प्रचंड महान अद्‌भूत सामर्थ्य असलेल्या व्यक्तीला ईश्वर मानण्यास कदापि नकार दिला नसता. पण पाहा. तो स्वत: काय म्हणत आहे. तो आपल्या अद्‌भूत सामर्थ्यांपैकी एकाचेही श्रेय स्वत:कडे घेत नाही. तो म्हणतो,

"मी एक मनुष्य आहे तुमच्याप्रमाणेच एक मनुष्य. माझ्याजवळ माझे आपले काही नाही. सर्व काही अल्लाहचे आहे आणि अल्लाहकडूनच आहे. ही वाणी (पवित्र कुरआन) जिच्यासमान अन्य वाणी प्रस्तुत करण्यात संपूर्ण मानवजात अयशस्वी ठरली आहे, ती माझी वाणी नव्हे. माझ्या बुद्धीच्या योग्यतेचे फळ नव्हे जिचे अक्षर न् अक्षर अल्लाहकडून आहे जी माझ्याकडे आली आहे व तिची प्रशंसा अल्लाहसाठीच आहे. या अविस्मरणीय कामगिऱ्या ज्या मी दाखविल्या आहेत, हे कायदे जे मी तयार केले आहेत, हे नियम जे मी तुम्हाला शिकविले, त्यांच्यापैकी एकसुद्धा गोष्ट मी स्वत: केली नाही. मी काहीही आपल्या स्वत:च्या योग्यतेने प्रस्तुत करण्यास असमर्थ आहे. प्रत्येक गोष्टीत अल्लाहच्या मार्गदर्शनाचा मी याचक आहे. तिकडून जो इशारा मिळतो तेच करतो व तेच म्हणतो."

पाहा हे कसले आश्चर्यजनक सत्य आहे. कसली सत्यनिष्ठता व सदाचार आहे. असत्यवचनी मनुष्य तर मोठा बनण्यासाठी दुसऱ्यांचे अशा कौशल्यांचे श्रेयसुद्धा घेण्यात संकोच करीत नाही ज्यांच्या मूळस्रोतांचा शोध सहजपणे लागतो. परंतु हा माणूस त्या कौशल्यांचा संबंध आपल्याशी जोडत नाही. यांना जर त्याने आपली कौशल्ये म्हटले असते तर कुणीही त्याला खोटे म्हणू शकला नसता. कारण कोणाजवळही त्यांच्या मूळ स्रोतांप्रत पोचण्याचे कोणतेही साधन नव्हते. सत्याचा यापेक्षा अधिक स्पष्ट पुरावा अन्य काय होऊ शकतो? त्या माणसापेक्षा अधिक खरा अन्य कोण असू शकेल, ज्याला एका अत्यंत गुप्त मार्गाने अशी अनुपम कौशल्ये प्राप्त झाली असावीत आणि त्याने निस्संकोचपणे आपल्या मूळ स्रोतांचे अवतरण प्रस्तुत करावेत? मग सांगा पाहू की आम्ही त्याचे समर्थन का करू नये?

-०- समाप्त -०-